दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ६ वे अंक –२१४ मंगळवार दि.१४ एप्रिल २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४




# सावधान! राज्यात उष्णतेची लाट



पुणे : प्रतिनिधी

सध्याच्या हवामान स्थितीनुसार विदर्भ आणि मराठवाड्यात उन्हाचा कडाका प्रचंड वाढला आहे. चंद्रपूर, ब्रह्मपुरी, अकोला आणि वर्धा यांसारख्या शहरांमध्ये तापमान ४२ ते ४४ अंशावर च्या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने विदर्भातील नागरिकांना दुपारच्या वेळी बाहेर न पडण्याचे आवाहन केले आहे. लातूर, धाराशिव आणि नांदेड जिल्ह्यांतही कोरड्या हवामानामुळे उष्णतेची तीव्र लाट जाणवत आहे.

तसेच विदर्भ आणि मराठवाड्यासाठी ही खरोखरच चिंतेची बाब आहे. एप्रिलच्या मध्यावरच जर पारा ४२ अंश ते ४४ अंश पार करत असेल, तर मे महिना अधिक कठीण जाण्याची शक्यता आहे.

हवामान विभागान दिलेल्या इशा–यानुसार, या उष्णतेच्या लाटेचा सर्वाधिक फटका चंद्रपूर, अकोला, ब्रह्मपुरी, नागपूर आणि वर्धा या जिल्ह्यांना बसू शकतो. तसेच लातूर, जालना, धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगरचा काही भाग देखील उष्ण राहू शकतो. अशा परिस्थितीत स्वत:ची काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यात किमान तापमान २४ अंश सेल्सिअस असून कमाल तापमान ३६ अंश सेल्सिअस असण्याची शक्यता आहे. दिवसभर वातावरण दमट व उष्ण राहून दुपारी घामाच्या धारा लागणार आहेत् दुसरीकडे, पुण्यात पारा ४० अंशावर पोहोचला असून सोमवारी तापमान ४२ अंश सेल्सिअस नोंदलं जाण्याची शक्यता आहे. पुण्यातील लोहगाव आणि कोरेगाव पार्क परिसरात तापमान ४२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे.

**अकोला जिल्ह्यात ४२ अंशावर**

विदर्भातील अकोला येथे तापमान शनिवारी ४२ अंशाच्या पुढे गेले होते. अकोला शनिवारी राज्यातील सर्वात उष्ण जिल्हा ठरला होता. रविवारीही उन्हाचा कडाका जिल्ह्यात कायम होता. सोमवारीही अशीच परिस्थिती कायम होती.

**पश्चिम महाराष्ट्रातही तापमान वाढले**

दरम्यान, पश्चिम महाराष्ट्रातही तापमान वाढले असून उन्हाच्या झळा बसत आहेत. सोलापूर जिल्ह्यात पारा ४१.४ अंशावर पोहोचला होता. तसेच, सांगली आणि जेऊरमध्या रविवारी तापमान ४० अंश सेल्सिअस इतके नोंदले गेले होते. महाराष्ट्रात येत्या काही दिवसांत उष्णतेची लाट येण्याचा इशारा हवामान विभागाने वर्तवला आहे.















संपादकीय....

# मराठवाड्यात भूकंप

विदर्भ आणि मराठवाडा परिसर शनिवारी सकाळी भूकंपाच्या सौम्य ते मध्यम स्वरूपाच्या धक्क्याने हादरला त्यामुळे साहजिकच नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. शनिवारी सकाळी ८.४५ च्या सुमारास वाशिम शहर, यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यात शेंबाळ पिंपरी, नांदेड शहर व परिसर, हिंगोली तालुक्यातील पांगरा शिंदे येथे हलके ते मध्यम धक्के बसल्याची नोंद झाली. काही ठिकाणी भूकंपाच्या वेळी भूगर्भातून मोठा आवाज ऐकू आल्याचे नागरिकांनी सांगितले. छत्रपती संभाजीनगर येथील खगोलशास्त्र अभ्यासक डॉ. श्रीनिवास औंधकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, हिंगोली जिल्ह्यातील पांगरा शिंदे येथे झालेल्या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ४.७ इतकी नोंदवण्यात आली आहे. गत काही वर्षात या भागात भूकंपाच्या घटनांमध्ये वाढ झाली असून प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या पूर्वी या भागात ४.५ तीव्रतेचे धक्के नोंदवले गेले होते मात्र या वेळी तीव्रता अधिक असल्याने सुमारे ३० ते ३५ टन ऊर्जा निर्माण झाली आहे. आगामी काळात भूकंपाचे धक्के वाढत गेले तर मोठ्या भूकंपाची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे भूकंपप्रवण क्षेत्राचे सखोल भौगोलिक सर्व्हेक्षण करून कारणांचा शोध घेणे गरजेचे आहे.

३० ऑक्टोबर १९९३ रोजी किल्लारी येथे झालेल्या विध्वंसक भूकंपानंतर मराठवाड्यातील ही सर्वांत मोठी घटना मानली जात आहे. तज्ज्ञांच्या मते, या पार्श्वभूमीवर भूकंपरोधक बांधकामाची गरज अधिक अधोरेखित होते. विशेषत: माती व दगडांच्या घरांना धोका अधिक असून मजबूत आणि नियोजनबद्ध बांधकाम असलेल्या घरांचे नुकसान तुलनेने कमी होते त्यामुळे भविष्यातील धोका टाळण्यासाठी बांधकाम पद्धतीत बदल करणे आवश्यक आहे. भूकंपाच्या भूगर्भीय कारणांबाबत बोलताना, जमिनीखालील पाण्याचा साठा, पावसाचे प्रमाण आणि भौगोलिक रचना यांचा सखोल अभ्यास करणे गरजेचे असल्याचे औंधकर यांनी नमूद केले. हैदराबादमधील भूकंपशास्त्र संस्थांच्या मदतीने या भागाचा अभ्यास केल्यास भविष्यातील धोके ओळखता येऊ शकतात. हिंगोली जिल्ह्यात उभारण्यात येत असलेल्या महत्त्वाच्या लिगो प्रकल्पावरही या भूकंप मालिकेचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सुरुवातीला हा भाग भूकंपमुक्त मानला जात होता मात्र २०२० नंतर येत असलेल्या धक्क्यांमुळे आता या प्रकल्पाबाबत पुन्हा विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. भूकंपाबाबत अचूक पूर्वसूचना देणारी कोणतीही यंत्रणा सध्या उपलब्ध नसल्याचे तज्ज्ञांनी स्पष्ट केले मात्र काही प्राणी आणि पक्षी भूकंपाच्या आधी संवेदनशील प्रतिक्रिया देत असतात, असे निरीक्षण आहे.

मराठवाड्यातील या धक्क्यांमुळे नागरिकांनी घाबरून न जाता सावध राहणे तसेच प्रशासनाने तातडीने वैज्ञानिक पातळीवर उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. महाराष्ट्रात विविध भागात वेळोवेळी भूकंपाचे धक्के नोंदवले गेले असून काही घटना अत्यंत विनाशकारी ठरल्या आहेत. १९९३ मध्ये लातूर जिल्ह्यातील किल्लारी येथे ६.२ रिश्टर तीव्रतेचा भूकंप होऊन मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली होती. त्या आधी १९६७ मध्ये साता-यातील कोयना परिसरात ६.५ तीव्रतेचा धक्का बसला होता. अलिकडे मराठवाडा व विदर्भातील हिंगोली, नांदेड, यवतमाळ, वाशिम या जिल्ह्यांत सौम्य ते मध्यम भूकंप वारंवार होत आहेत. पालघर, नाशिक आणि पुणे परिसरातही हलक्या धक्क्यांची नोंद झाली आहे.

# मुखेड येथे काँग्रेस पक्षाच्या वतीने पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी संघटन सृजन अभियानास सुरुवात

मुखेड । प्रतिनिधी

काँग्रेस पक्षाच्या वतीने संघटन सृजण अभियानाचे आयोजन संपूर्ण महाराष्ट्रभर आयोजित केलेले असून त्याचाच एक भाग म्हणून मुखेड - कंधार विधानसभा मतदारसंघात या अभियानाची सुरुवात जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष तथा माजी आमदार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांच्या अध्यक्षतेखाली व अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ निरीक्षक ना.हरकरा वेणूगोपालजी,नेते,सुरज तिवारी,प्रदेश काँग्रेसचे केदार पाटील साळुंखे,महासचिव डॉ.श्रावण रॅपणवाड,एकनाथजी मोरे,जिल्हा उपाध्यक्ष राजनजी देशपांडे,महिला कांग्रेसच्या तालुकाध्यक्ष उज्वलाताई पत्रे,युवा नेते अभिजीत पाटील बेटमोगरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली.

अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे निरीक्षक ना.वेणुगोपालजी बोलताना म्हणाले नांदेड जिल्हा हा काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला म्हणून महाराष्ट्रभर ओळखल्या जात होता,काँग्रेस पक्षात असताना ज्यांना केंद्रात व राज्यात पक्षाने मंत्रीपदे दिल्यावरही स्वतःच्या स्वार्थासाठी इतर पक्षात प्रवेश केला.परंतु काँग्रेस पक्ष व्यापक विचाराचा पक्ष असून प्रत्येकाला न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे जे पक्ष सोडून गेले ते जाऊ द्या आपण सर्वजण राहुल गांधींना पंतप्रधान म्हणून पाहण्यासाठी जनसामान्याच्या हक्कासाठी काँग्रेस पक्षाची ताकद याच संघटन सृजन अभियानाच्या माध्यमातून मोठी करण्याची जबाबदारी आपणा सर्वावर आहे असे सांगितले.

नांदेड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष तथा माजी आमदार बेटमोगरेकर म्हणाले वेणूगोपाल सर हीच समोर बसलेली जनता होती म्हणून मी मागच्या काळात आमदार झालो,लोकांची सेवा करण्याची संधी मला मिळाली,कोण कुठे जातो यापेक्षा आपण याच पक्षात निष्ठेने राहून काँग्रेस पक्ष मोठा करण्यासाठी मोठ्या जिद्दीने प्रयत्न करणार असल्याचे पक्ष निरीक्षकासह आजी माजी लोकप्रतिनिधी,पदाधिकारी कार्यकर्त्यासमोर अभिवचन दिले.

या जिल्ह्यातील काँग्रेस टिकून ठेवण्यासाठी व दोन वेळेस काँग्रेसचा खासदार निवडून आणण्यासाठी खुप प्रयत्नाची पराकाष्ठा केली,याच हणमंतरावांनी अथक परिश्रम घेतले असून येणाऱ्या काळात या भागाचे नेतृत्व जिवंत ठेवायचे असेल,काँग्रेसला पुन्हा बळकटी देण्याचे असेल तर हणमंतराव पाटील बेटमोगरेकर



यांनाच जिल्हाध्यक्षपदी पुन्हा विराजमान होण्याची संधी दयावी असे मुखेड मायनॉरिटीचे अध्यक्ष शौकतखाँ पठाण यांनी आपल्या भावुक शब्दातून व्यक्त झाले.

काँग्रेस जिल्हाध्यक्षांच्या निवडी संदर्भात पक्ष निरीक्षकांनी चाचपणी करण्यासाठी मुखेड येथे आलेले असून जिल्हाध्यक्ष कोणाला करायचे याबाबत प्रत्येक पदाधिकारी आजी-माजी लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांची मुलाखत घेण्यात आली,या मुलाखतीबाबत पक्षनिरीक्षकांनी अत्यंत गोपनीयता बाळगलेली असून मुलाखतीत आलेल्या नावासंदर्भात कुणाच्याही नावाची वाच्यता न करता वरिष्ठांकडे शिफारस करण्यात येईल सदरची निवड प्रक्रिया अत्यंत पारदर्शक असून लोकातून आलेल्या व्यक्तीच्या नावालाच जिल्ह्याचे अध्यक्षपद दिले जाईल असे पक्ष निरीक्षक वेणूगोपालजींनी आपल्या भाषणातून पक्षाची भूमिका विषद केली.

मुखेड येथील जनसंपर्क कार्यालयात पक्षनिरीक्षक ना. वेणूगोपालजी यांचा सत्कार शहर काँग्रेसच्या वतीने हणमंत नारनाळीकर यांनी केला.तर प्रमुख मान्यवरांचा सत्कार पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्त्यांनी केला.या संघटन सृजण अभियानासाठी शहरातून व ग्रामीण भागातून पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी उपस्थिती दर्शवली.*या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन हणमंत नारनाळीकर यांनी केले प्रास्ताविक तालुका काँग्रेसचे कार्याध्यक्ष संभाजी पाटील उन्द्रीकर तर आभार जिल्हा युवक काँग्रेसचे सरचिटणीस आकाशपाटील ऊंद्रीकर यांनी मानले.*

या कार्यक्रमास खरेदी विक्री संघाचे माधवराव पाटील वडजे उंद्रीकर,अच्युत पाटील बिल्लाळीकर,पांडुरंग भिकनर सकनुरकर,रमेश तेलंग,मैनुसाब येवतीकर,पंचायत समितीचे माजी सदस्य वसंत पाटील येवतीकर,शादुल पाटील रावणगावकर बालाजी देशमुख भाटापूरकर,गोविंदराव पाटील सुगावकर,गंगाधर गंडमळे मांजरी,अजित वडजे कबनूरकर महादेव सोनकांबळे,माधव हुरजळ शिकारेकर,बेगबाबु धामणगावकर,बाबू पाटील पोले पैसमाळकर,माधव कदम बिल्लाळीकर,प्रवीण मंगसुळी नागराळ,दत्तात्रय पंताडे सुगाव,विठ्ठल बाजगीरे कुंदराळा,विलास पाटील ईमडे शिकारा,सयाजी गजेले चिवळी,बालाजी ठावरे,शिरूर चंद्रकांत जारीकोटे मंग्याळ,मुरलीधर देशमुख कबनूर,लक्ष्मण पाटील बेळीकर,सुरेश नवले,बेटमोगरा,बालाजी बोडके धनज,प्रकाश पाटील लिंगापूर,मारुती टेकाळे खतगाव,सय्यद मुज़ीप जांब,मारुती पाटील,अविनाश इंगळे पाटील बिल्लाळी,इरफान मोमीन सावरगावकर, माधव गवळे कर्णा,ब्रह्मानंद बोडके धनज,बालाजी बोडके धनज,संजय नुक्कुलवार उच्चा,व्यंकटेश कुणके पाटील जांभळी,जिल्हा काँग्रेसचे सहसचिव विश्वंभर पाटील मसलगेकर,भानुदास पाटील बेटमोगरा,उपसरपंच सचिन गुद्दे, धनराज पाटील बेटमोगरेकर,मंगेश पाटील येल्लुरकर,सरपंच नयुम दफेदार,सोशल मिडीया काँग्रेस अध्यक्ष तिपणे,शेख रफिक बामणीकर,वृत्तपत्र छायाचित्रकार हाफीजभाई पठाण सह परिसरातील पदाधिकारी कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

*हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष नारनाळीकर,युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष सुरेश पाटील बेळीकर,तालुका युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष एम.आर.गोपणर,युवक काँग्रेस जिल्हा सरचिटणीस सुनील पाटील आरगीळे,जिल्हा सेवा दलाचे उपाध्यक्ष विद्याधर साखरे,काँग्रेस उपाध्यक्ष बालाजी वाडेकर,उपाध्यक्ष शिवाजी गायकवाड सोशल मीडिया शहराध्यक्ष केतन मामडे यांनी परिश्रम घेतले.*

# सावरकर महाविद्यालय व ज्ञान भारतीच्या संयुक्त विद्यमाने 'नारी तू नारायणी' परिषद संपन्न

**वेशभूषा स्पर्धेत महिलांचा उत्स्फूर्त सहभाग; सिंधुताई सपकाळ व जिजाऊंच्या रूपाने अवतरला इतिहास**

बीड (प्रतींनिधी)

स्वा. सावरकर महाविद्यालय आणि ज्ञान भारती (राष्ट्र सेविका समिति, बीड) यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच 'नारी तू नारायणी' परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेचे मुख्य आकर्षण ठरलेल्या जिल्हास्तरीय पारंपरिक वेशभूषा स्पर्धेत महिलांनी विविध ऐतिहासिक आणि सामाजिक भूमिका साकारून समाजासमोर प्रेरणादायी आदर्श उभे केले.

या परिषदेस प्रमुख अतिथी म्हणून भाजपा गटनेत्या मा. सारिकाताई क्षीरसागर उपस्थित होत्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून वरद आयुर्वेद चिकित्सालयाच्या डॉ. पद्मश्री जोशी यांची उपस्थिती होती. या मान्यवरांच्या हस्ते वेशभूषा स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.



स्पर्धेत महिलांनी ऐतिहासिक पात्रांच्या वेशभूषेतून उपस्थितांची मने जिंकली. निकाल पुढीलप्रमाणे राहिले प्रथम क्रमांक: विद्या प्रशांत जाधवर (भूमिका: सिंधुताई सपकाळ), द्वितीय क्रमांक: सुरभी आदित्य खोपटीकर (भूमिका: मावशी लक्ष्मीबाई केळकर), तृतीय क्रमांक (विभागून): गीतांजली आण्णा शेळके (भूमिका: राष्ट्रमाता जिजाबाई) आणि नंदिनी नंदकुमार रुईकर (भूमिका: डॉ. आनंदीबाई जोशी) आणि उत्तेजनार्थ: डॉ. सौ. स्नेहल अतुल जोशी (भूमिका: येसूबाई)

याप्रसंगी सारिकाताई क्षीरसागर यांनी 'महिला विकास योजना' या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. डॉ. पद्मश्री जोशी यांनी 'महिला आत्मसुरक्षा' या विषयावर तर प्रांत बौद्धिक प्रमुख सौ. उज्ज्वला मसलेकर यांनी 'नारी तू नारायणी' या विषयावर प्रबोधन केले. परिषदेत 'नारी सन्मान' अंतर्गत कोरो एकल महिला संघटनेच्या रुक्मिणी नागापुरे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी आपल्या भाषणात महिलांच्या प्रगतीचा गौरव केला. स्त्रीशक्तीने केवळ कुटुंबच नाही तर समाज आणि देश उभारणीत मोठे योगदान दिले आहे, असे उपक्रम महिलांच्या आत्मविश्वासात भर टाकतात, असे विचार त्यांनी व्यक्त केले.

परिषदेचे प्रास्ताविक सौ. उम्रजकर यांनी केले. ज्ञान भारतीच्या संयोजिका प्रो. रुपाली कुलकर्णी यांनी परिषदेचा सूत्रपात केला. वेशभूषा स्पर्धेची संपूर्ण जबाबदारी प्रो. अनुजा कास्तीकर आणि प्रा. दीपा देशपांडे यांनी यशस्वीपणे पार पाडली. स्पर्धेचे परीक्षण सौ. माधुरी कुलकर्णी व अश्विनी टेकाळे यांनी केले.

राष्ट्र सेविका समिति बीड जिल्हा कार्यवाहिका सौ. जयश्री नेलवाडकर यांनी सर्वांचे आभार मानले. या परिषदेसाठी राष्ट्र सेविका समितीच्या सदस्या, सावरकर संकुलातील महिला कर्मचारी आणि शहरातील विविध क्षेत्रांतील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



# इतिहासाशी छेडछाड खपवून घेतली जाणार नाही..!

माजलगाव / विजय कापसे

इयत्ता आठवीच्या इतिहास विषयातील पुस्तकातून मराठा साम्राज्याचा नकाशा हटविण्याच्या छ्उएठढ च्या निर्णयाविरोधात जागर प्रतिष्ठान संघटना आक्रमक झाली असून, बीड जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करून तीव्र निषेध नोंदविण्यात आला.जागर प्रतिष्ठानच्या वतीने सांगण्यात आले की, मराठा साम्राज्याचा नकाशा हा हिंदी, उर्दू आणि इंग्रजी या तिन्ही माध्यमांच्या पुस्तकांमधून हटविण्यात आलेला आहे. हा प्रकार म्हणजे देशाच्या इतिहासाशी जाणीवपूर्वक छेडछाड करून भावी पिढ्यांची दिशाभूल करण्याचा गंभीर प्रयत्न आहे.

जागर प्रतिष्ठानने स्पष्ट शब्दांत इशारा दिला की,छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पराक्रमाचा इतिहास पुसण्याचा प्रयत्न अजिबात सहन केला जाणार नाही. मराठा साम्राज्याचा नकाशा तात्काळ पूर्ववत न केल्यास जागर प्रतिष्ठान रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल.

सर्व माध्यमांच्या पुस्तकांमध्ये मराठा साम्राज्याचा नकाशा तात्काळ पूर्ववत करावा ,या निर्णयामागील कारणांची चौकशी करावी,संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी या मागण्या जागर प्रतिष्ठानने केल्या आहेत.

# स्वयंपाकघरातील मसाल्यांत दडलंय आरोग्याचं गुपित

**आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचे 'वनस्पती शिबिर' उत्साहात**
**३६० नागरिकांनी घेतला लाभ; ८० पेक्षा जास्त औषधी द्रव्यांचे प्रदर्शन**

प्रतिनिधी । बीड

आपल्या स्वयंपाकघरात रोज वापरले जाणारे जिरे, धने, मिरे आणि हिंग हे केवळ चव वाढवणारे पदार्थ नसून ते आरोग्याचे रक्षक आहेत, हा संदेश 'आदित्य आयुर्वेद महाविद्यालया'च्या वतीने आयोजित शिबिरातून देण्यात आला. आदित्य शिक्षण संस्थेचे संस्थापक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय माध्यमिक विद्यालय, सारडा पार्क येथे शनिवार दि. ११ एप्रिल रोजी 'स्वयंपाकघरातील औषधी वनस्पती' या विषयावर भव्य शिबिर पार पडले. या प्रदर्शनाचा बीडमधील ३६० नागरिकांनी लाभ घेतला. ८० पेक्षा जास्त औषधी द्रव्यांचे प्रदर्शन विद्यार्थ्यांनी भरवले होते.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा तर प्रमुख पाहुणे म्हणून अन्न सुरक्षा अधिकारी अजय गाढे, अंकुश नरवाडे आणि सिद्धार्थ चव्हाण हे उपस्थित होते. त्यांनी अन्न सुरक्षा आणि औषधी वनस्पतींचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य, शाळेच्या मुख्याध्यापिका आणि संस्थेच्या विविध विभागांचे प्राचार्य उपस्थित होते.

अंकुश नरवाडे (अन्न सुरक्षा अधिकारी) यांनी बोलताना सांगितले कि,केवळ आजारी पडल्यावर उपचार करण्यापेक्षा, स्वयंपाकघरातील वनस्पतींचा वापर करून आरोग्य कसे टिकवावे, हे या शिबिराने शिकवले आहे, असे अन्न सुरक्षा अधिकारी सिद्धार्थ चव्हाण म्हणाले. आदित्य शिक्षण संस्थेने अशा सामाजिक उपक्रमातून सर्वसामान्य नागरिकांशी जोडलेली नाळ ही शहराच्या आरोग्यासाठी अत्यंत आश्वासक आहे.

केवळ आजारी पडल्यावर उपचार करण्यापेक्षा, स्वयंपाकघरातील वनस्पतींचा वापर करून आरोग्य कसे टिकवावे, हे या शिबिराने शिकवले आहे, असे अन्न सुरक्षा अधिकारी सिद्धार्थ चव्हाण म्हणाले. आदित्य शिक्षण संस्थेने अशा सामाजिक उपक्रमातून सर्वसामान्य नागरिकांशी जोडलेली नाळ ही शहराच्या आरोग्यासाठी अत्यंत आश्वासक असल्याचे सिद्धार्थ चव्हाण (अन्न सुरक्षा अधिकारी) यांनी यावेळी नमूद केले.

विद्यार्थ्यांचा सहभाग आणि जनजागृती

या प्रदर्शनास सुमारे ३६० नागरिकांनी भेट देऊन आरोग्याविषयीची शंकांचे निरसन करून घेतले. महाविद्यालयातील २०० विद्यार्थ्यांनी या शिबिराचे नियोजन आणि माहिती देण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदवला. या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न मिळता, प्रत्यक्ष लोकसंवाद साधल्यामुळे व्यवहारी ज्ञानाचाही अनुभव आला. कार्यक्रमाचे यशस्वी नियोजन प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखाली, द्रव्यगुण विभागाच्या प्राध्यापिका डॉ. मयुरी शिंदे-करंडे, प्रा. रामेश्वर ढोबळे आणि इतर शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले.

या उपक्रमामुळे बीड शहरात घरगुती औषधी वनस्पतींबाबत मोठी जागरूकता निर्माण झाली असून, आयुर्वेदाचा वारसा घराघरात पोहोचवण्यास मदत झाली आहे.आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाचा उपक्रम कौतुकास्पद : अजय गाढे (अन्न सुरक्षा अधिकारी)आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश घराघरात पोहोचवण्यासाठी आदित्य आयुर्वेद महाविद्यालयाने राबवलेला हा उपक्रम अत्यंत स्तुत्य आणि काळाची गरज आहे, असे गौरवोद्गार अन्न सुरक्षा अधिकारी अजय गाढे यांनी काढले. ते म्हणाले केवळ पुस्तकी ज्ञान न देता, विद्यार्थ्यांनी स्वयंपाकघरातील ८० हून अधिक वनस्पतींचे प्रत्यक्ष स्टॉल्स लावून सर्वसामान्यांना दिलेली माहिती ही कौतुकास्पद बाब आहे. धने, मिरे, केशर, हिंग यांसारख्या दैनंदिन पदार्थांचे औषधी महत्त्व पटवून देण्यात आदित्य कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी घेतलेली मेहनत शहरासाठी भूषणावह आहे. संस्थेचे संस्थापक सुभाषचंद्रजी सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली हे महाविद्यालय सामाजिक आरोग्यासाठी जे कार्य करत आहे, ते खरोखरच वंदनीय आहे.

२०० विद्यार्थ्यांनी दिली औषधी गुणधर्मांच्या फायदे तोट्याची माहिती

शिबिरात मुख्य आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी लावलेले ८० पेक्षा अधिक माहितीपूर्ण स्टॉल्स. यामध्ये केवळ वनस्पतीच नव्हे, तर दैनंदिन वापरातील महत्त्वाच्या द्रव्यांचा समावेश होता. त्यामध्ये धने, मिरे, चिंच, केशर, जायफळ, लसूण, तेजपत्ता, बडीशेप, गवती चहा, कोकम. दही, ताक, हिंग आणि मध यांसारख्या पदार्थांचे औषधी गुणधर्म काय आहेत हे प्रत्येक स्टॉलवर विद्यार्थ्यांनी येणाऱ्या नागरिकांना त्या वनस्पतीचा उपयोग, सेवन करण्याची शास्त्रीय मात्रा (डोस), त्याचे फायदे आणि अतिवापराचे तोटे याबद्दल सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी मांडलेल्या या 'जिवंत प्रयोगशाळे'ने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.




# जिजामाता फिजिओथेरपी महाविद्यालयात 'क्रीडा सप्ताहा'चा जल्लोषमय थरार!

माजलगाव (प्रतिनिधी)

येथील जिजामाता फिजिओथेरपी महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक क्रीडा महोत्सवाने विद्यार्थ्यांच्या उत्साहाला अक्षरशः उधाण आले. 'द्वितीय वार्षिक क्रीडा दिना'निमित्त विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून संपूर्ण परिसर खेळाच्या उत्साहाने भारावून गेला होता. क्रिकेट, व्हॉलीबॉल, थ्रो बॉल, बुद्धिबळ, कॅरम, बॅडमिंटन अशा विविध स्पर्धांमुळे महोत्सवाला विशेष रंगत आली. खेळाडूंच्या उत्स्फूर्त सहभागामुळे आणि प्रेक्षकांच्या टाळ्यांच्या कडकडाटामुळे वातावरण उत्साहपूर्ण झाले होते.

सविस्तर वृत्त असे की, या क्रीडा महोत्सवातील क्रिकेट स्पर्धेने विशेष आकर्षण ठरवले. अंतिम सामन्यात तृतीय वर्षाच्या 'डॉमिनेटर्स' संघाने प्रथम वर्षाच्या 'रॉयल' संघावर ८ गडी राखून दणदणीत विजय मिळवत विजेतेपद पटकावले. प्रथम फलंदाजी करताना रॉयल संघाने १० षटकांत ४९ धावांचे आव्हान उभे केले. त्यांच्या सलामीवीराने चांगली फलंदाजी केली असली तरी तृतीय वर्षाच्या गोलंदाजांनी अचूक मारा करत धावसंख्येवर नियंत्रण मिळवले. प्रत्युत्तरात डॉमिनेटर्स संघाने आक्रमक फलंदाजी करत चौकार-षटकारांची बरसात केली आणि अवघ्या सहा षटकांत विजय संपादन केला. अविले प्रथमेश याने ४ गडी बाद करत सामन्याचा 'सामनावीर' ठरला.इतर स्पर्धांमध्येही विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. मुलांच्या क्रिकेटमध्ये डॉमिनेटर्स संघ विजयी ठरला, तर मुलींच्या क्रिकेटमध्ये रॉयल संघाने बाजी मारली. व्हॉलीबॉलमध्ये थंडर संघाने, थ्रो बॉलमध्ये तनवीर पठाण हिने, बुद्धिबळ स्पर्धेत रोहित शेटे व किरण लिंगाळे यांनी, कॅरममध्ये अरमान मुर्शद व सानिका वाघमारे यांनी, तर बॅडमिंटनमध्ये शिवानी सोसे, अलिशा शेख तसेच अरमान मुर्शद व मनोज गर्डे यांनी यश संपादन केले. प्रत्येक स्पर्धेत खेळाडूंनी दाखवलेली जिद्द, चिकाटी आणि क्रीडाभावना विशेष उल्लेखनीय ठरली.

या प्रसंगी सिंदफणा पब्लिक स्कूलचे क्रीडा विभाग प्रमुख दीपक माने सर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पॉल राज सर तसेच जिजामाता नर्सिंग महाविद्यालयाचे प्राचार्य विनोद कुमार सर यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणातून अभ्यासाबरोबरच शारीरिक तंदुरुस्ती आणि खेळांची सवय ही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक आहे, असा मौलिक संदेश दिला. यावेळी कार्यालय अधीक्षक वाघ सर, शिंदे सर, इरफान पठाण सर तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.एकूणच, या क्रीडा महोत्सवामुळे विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, शिस्त, आत्मविश्वास आणि क्रीडावृत्ती यांचा विकास झाला असून महाविद्यालयाच्या क्रीडा परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. उत्साह, आनंद आणि खेळाडूवृत्तीने परिपूर्ण असा हा 'क्रीडा सप्ताह' सर्वांच्या स्मरणात दीर्घकाळ राहणारा ठरला.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# दिवाळखोरीत निघालेल्या बँकांना जिल्हा प्रशासनाने धारेवर धरले..!

## आ. प्रकाश सोळंके आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या आक्रमक भूमिकेमुळे ठेवीदारांच्या आशा झाल्या पल्लवीत..?

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये दिवाळखोरीत निघालेल्या दहापेक्षा अधिक सहकारी संस्थांमुळे लाखो ठेवीदारांवर आर्थिक संकट कोसळले आहे. आयुष्यभराची कमाई दिवाळखोरीत निघालेल्या बँकांमुळे ठेवीदारांची अडचणीत आली आहे. बँकेतील प्रत्येक ठेवीदाराला त्यांच्या हक्काचा पैसा परत मिळाला पाहिजे यासाठी माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके आणि बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी विशेष बाब म्हणून बैठक घेऊन संबंधित अवसायनात निघालेल्या सहकारी संस्थांचा आढावा घेतला आणि त्यांना चांगली तंबी भरली आहे. या संदर्भात एक महिन्यानंतर पुन्हा एकदा आढावा घेण्याबाबत आदेशित केले आहे. प्रशासनाच्या या सकारात्मक भूमिकेमुळे नैराश्याच्या खाईत अडकलेल्या लाखो ठेवीदारांच्या अशा पुन्हा एकदा पल्लवीत झाल्या आहेत.

महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय आस्थापनेमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ (चझखऊ -लीं १९९९) अन्वये बंद पडलेल्या क्रेडिट सोसायटीबाबत जिल्हाधिकारी, बीड यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेण्यात आली.

सदर बैठकीस आ.प्रकाश सोळंके, विधानसभा सदस्य, माजलगाव, पोलीस अधिक्षक, बीड, पोलीस अधिक्षक (उखऊ), छत्रपती संभाजीनगर त.उ द्वारे, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, लातूर त.उ द्वारे,सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, माजलगाव, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, बीड,सहाय्यक सरकारी वकील, बीड व माजलगाव,पोलीस निरिक्षक (आर्थिक गुन्हे शाखा) बीड, संबंधित क्रेडिट सोसायटीचे अवसायक,जिल्हा सहनिबंधक, मुद्रांक बीड तसेच लोकप्रतिनिधी व अधिकारी उपस्थित होते.



या बैठकीमध्ये माजलगाव तसेच बीड जिल्हयातील सर्व बंद पडलेल्या १) परिवर्तन अर्बन मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सो. लि. माजलगाव २) सामाजिक परिवर्तन नागरी सहकारी पतसंस्था माजलगाव ३) दि. मराठवाडा अर्बन को-ऑप क्रेडिट सो. लि. माजलगाव ४) हिंदवी स्वराज्य अर्बन को ऑप क्रेडिट सो.लि. माजलगाव ५) ज्ञानराधा क्रेडिट सोसायटी (६) राजस्थानी मल्टीस्टेट क्रेडिट सोसायटी ७) शुभकल्याण क्रेडिट सोसायटी ८) छत्रपती मल्टीस्टेट क्रेडिट सोसायटी ९) मातोश्री क्रेडिट सोसायटी १०) साईराम अर्बन क्रेडिट सोसायटी ।।) मेरीट लॅन्ड मार्कस कंपनी इत्यादी पतसंस्थाच्या अवसायनाच्या कामकाजाबाबत, चझखऊ प्रकरणांच्या सदयस्थितीबाबत आढावा घेण्यात आला. बैठकीमध्ये त्यांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या,

अवसायक यांनी कर्जप्रकरणाच्या वसुलीच्या कार्यवाहीस गती दयावी, बनावट कर्ज प्रकरणे आढळल्यास कायदेशीर कारवाई करावी.,२. चझखऊच्या न्यायालयात दाखल प्रकरणात सक्षम प्राधिकारी यांनी सरकारी वकीला मार्फत भक्कमपणे बाजू मांडून जप्त मालमत्तांच्या लिलावाची परवानगी घ्यावी.,३. ठेवीदारांच्या रक्कमेचा अपहार करणारे क्रेडिट सोसायटीचे मुख्य प्रवर्तक, संचालक मंडळ, अपहारात सामील असणारे कर्मचारी यांच्या मालमत्तांचा शोध घेऊन पुरवणी प्रस्ताव शासनाच्या मंजूरीसाठी पाठविण्यात यावा, ४. मा. मुख्य जिल्हा न्यायाधीश यांना पत्र देऊन चझखऊ प्रकरण बाबत कामकाज गतीने होण्यासाठी विनंती करावी, ५. शासनस्तरावर प्रलंबित असणा-या चझखड) प्रस्तावांचा पाठपुरावा करुन जप्तीचे आदेश प्राप्त करुन घ्यावेत. ६. जप्त मालमत्तांचे हस्तांतर होऊ नये म्हणून मा. नोंदणी महानिरिक्षक यांना पत्र दयावे,७. सर्व प्रकरणात फॉरेन्सिक ऑडिट व सहकार विभागाचे ऑडिट करुन घ्यावे.,८. सक्षम प्राधिकारी, अवसायक व पोलीस विभाग यांनी आपआपसांत योग्य समन्वय ठेऊन सर्व प्रकरणांना गती दयावी असे आवाहन करण्यात आले.तसेच पुढील बैठक १ महिन्यानंतर घेण्यात येईल असे सांगितले.

# बुद्ध विहारात धम्माचे संस्कार करून आदर्श समाज निर्माण करा: पूज्य भिक्खु धम्मशिल थेरो

## भव्य रॅली काढून पालवन चौक येथे बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापणा

बीड/प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना धर्मातरांची घोषणा करून १४ ऑक्टोबर १९५६ साली नागपुर ममुक्कामी तथागत बुद्ध धम्माची दीक्षा घेऊन दया, क्षमा, शांती, करुणा व मैत्रीचा संदेश देणारा तथागतांचा धम्म दिला. तथागताच्या सद धम्माचा प्रसार व प्रचार करण्यासाठी सम्यक सम्बुद्ध जयंती औचित्य साधून दि.१३ एप्रिल सोमवार रोजी बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापणा व अनावरण सोहळ्यास पुज्य भिक्खु डॉ. इंदवंस्स महाथेरो (छ. संभाजीनगर), पुज्या भिक्खु धम्मशील थेरो (महाविहार धम्मभूमी शिवणी),पूज्य भिक्खु अश्वजित (छ. संभाजीनगर), पुज्य भिक्खु सुमेधबोधी (छ. संभाजीनगर) पुज्य भद्रेय (छ संभाजीनगर) यांच्या प्रमुख उपस्थितीत पालवन चौकापासून नागसेन बुद्ध विहारापर्यंत भव्य मिरवणूक काढून बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापणा करण्यात आली.पूज्य भिक्खु यांच्या वतीने उपासक-उपासिका यांना धम्मदेसना देण्यात आली.

बुद्ध मूर्तीच्या प्रतिष्ठापणा प्रसंगी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, प्रा.प्रदीप रोडे, सुशिलाताई मोराळे,ड भगवान कांडेकर, शितलकुमार सुकाळे, अजय सवाई, प्रा.विठ्ठल गाडे, यांनी आपले मनोगत व्यक्त केले.बुद्ध मूर्तीच्या प्रतिष्ठापना प्रसंगी पूज्य भिक्खु धम्मशिल थेरो म्हणाले की, डॉ.आंबेडकरांनी समाज बांधवाना



मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, सामाजिक शैक्षणिक, आर्थिक, व राजकीय प्रगतीसाठी क्रांती केली. बुद्ध धम्माची दीक्षा घेऊन धम्म क्रांती केली व दया, क्षमा, शांती, करुणा व मैत्रीचा संदेश देणारा तथागताचा धम्म दिला. तथागताच्या सद धम्माचा प्रसार व प्रचार करण्याची जबाबदारी सर्व आंबेडकरी अनुयायाची आहे. बुद्धांचे तत्वज्ञान आत्मसात करून तथागताच्या धम्माची चळवळ गतिमान करण्यासाठी दर रविवारी उपासक-उपासिका यांनी बुद्ध विहारात बुद्ध वंदना घेऊन बुद्ध धम्माचे अनुकरण करणे सर्वांची जबाबदारी आहे. शांतीने जगण्यासाठी बुद्धाच्या तत्वज्ञानाशिवाय पर्याय नाही. कारण जगाला युद्धाची नाहीतर बुद्धाच्या तत्त्वज्ञानाची गरज आहे.

यावेळी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी बुद्ध मूर्तीच्या प्रतिष्ठापनेसाठी राजू जोगदंड, शितलकुमार सुकाळे, मनोज नाना मस्के, संतोष जाधव, समाधान जाधव, बबन डोळस यांनी परिश्रम घेतल्याबद्दल सत्कार केला.यावेळी अच्युत उजगरे, डॉ. अमरेंद्र विद्याघर, उमाजी वाघमारे, प्रा.टी.जी. कांबळे ड.कल्याण गाडे, गौतम चोपडे, अभिमन्यू सोनवणे प्रमोद शिंदे (नगरसेवक), रणजित बनसोडे, शितल चक्रे (नगरसेवक), बाबासाहेब ओव्हाळ, आश्रूबा शिंदे, प्रशांत वासनिक, उत्तम पवार, ईश्वर धनवे, विनोद औसरमल, अशोक ठोकळ, सुमेध जोगदंड, गौतम जाधव, गौतम चक्रे, मनोज वाघमारे, अविनाश जोगदंड, कालिंदा मस्के,ड.सुरेश वडमारे, ड.जेतज वडमारे,ड.चंद्रवर्धन जाधव,ड. भाऊसाहेब भोसले, बाबुराव गालफाडे, काशिनाथ वाघमारे, उमाजी आठवले, राजेभाऊ गायकवाड, श्रीमंत उजगरे, रामचंद्र कसबे, धर्मराज वाव्हळे, मधुकर गायकवाड, प्रेम कांबळे, रवि वाघमारे, यांच्यासह या कार्यक्रमास सामाजिक, राजकिय क्षेत्रातील मान्यवर तसेच उपासक-उपासिका उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव इनकर,विश्वमाला इनकर यांनी केले.

नागसेन बुद्ध विहार पालवन चौक बीड येथे आयोजित बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापणा व अनावरण सोहळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिति बीड शहर यांच्याकडे शिल्लक असलेल्या रकमेतून साजरा करण्यात आला.



# मोफत शिकवणी वर्गातील ६० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपकरुन

## क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन

( वाचाल तर वाचाल चा उपक्रम )

बीड । प्रतिनिधी

कोरोना काळापासून महामानव अभिवादन ग्रुप बीड गरजू व होतकरू विद्यार्थ्यांकरिता शहरातील विविध भागात आज पर्यंत ५ मोफत शिकवणी वर्ग चालवत आहे. त्या वर्गातील विद्यार्थ्यांना सतत प्रोत्साहन द्यावे म्हनुन ,अभ्यासातीलक्ष सातत्य व स्पर्धेत राहावे म्हणून सर्ववर्गशिक्षकक्ष कष्ट घेत आहे या उपक्रमाच्या अंतर्गत वाचाल तर वाचाल मोफत फिरते वाचनालय सातत्यपूर्ण वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा व महापुरुषांच्या जीवनावरील कार्यक्रम आयोजित करत असते.

मासिक घटक चाचणी परीक्षा घेन्यात येतात,घटक चाचणी परीक्षेत २४ गुनवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही पेन) व उर्वरित ३६ विद्यार्थ्यांना वार्षिक परीक्षेचे दिवस असल्यामुळे पेज वाटप करून परीक्षेकरिता शुभेच्छा दिल्या. राजगृह बुद्ध विहार आम्रपाली बुद्ध विहार जय भीम बुद्ध विहार येथे रवींद्र टेकाळे व त्यांच्या पत्नी टेकाळे, प्रकाश आंबेडकर नगर येथे विशाखा वाघमारे व इंदिरानगर येथे मोफत शिकवणी वर्गातील शिक्षिका शितल जावळे हे विद्यार्थ्यांच्या प्रगती करता बहुमोल कष्ट घेत आहेत. महामानव अभिवादन अध्यक्ष जी. एम. भोले, प्रा.डॉ.नायदेव सिनगारे, कॅप्टन राजाभाऊ आठवले,वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालया तर्फे सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# विश्वभूषन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करत असतांना

## ।। एक आठवण बाबासाहेबांची ।।बाबासाहेबांच्या शेवटच्या ५ वर्षातील ही सत्य घटना आहे

रात्रीच्या ९ वाजण्याची वेळ....

नानकचंद रत्तू बाबासाहेबांना म्हणाले मी घरी जातोय , तूम्हाला पाहीजे त्या सर्व वस्तू इथे ठेवलेल्या आहेत आणखी काही पाहीजे असेल तर सांगा..... बाबासाहेब म्हणाले जा तू पण सकाळी लवकर याच वेळेवर ये, एवढं ऐकून नानकचंद घरी निघून गेले, पुन्हा सकाळी बाबासाहेबांनी सांगीतलेल्या वेळेस बरोबर ९ वाजता नानकचंद हजर झाले ,......

बघतात तर बाबासाहेबांचे लिखाण चालूच आहे. नानकचंद तसेच बाजूला गप्प उभे राहीले साधारणता

१५ ते २० मिनिटे झाली असतील बाबासाहेबांची अचानक उभ्या असलेल्या नानकचंदवर नजर गेली आणि बाबासाहेब म्हणाले नानकचंद तू अजून इथेच उभा का? जा लवकर घरी आणि सकाळी लवकर ये ..... हे ऐकून नानकचंदच्या डोळ्यात अश्रू तरळले ते बाबासाहेबांना म्हणाले..... ..अहो बाबासाहेब सकाळ झालीय मी घरी जाऊन परत आलोय.

तुमची प्रकृती बरी नाही , एवढं जागे राहून काय लिहिताय? तेव्हा बाबासाहेब म्हणाले माझ्या समाजासह संपूर्ण बहुजन समाज झोपेत आहे, त्यामुळे मला जागेच रहावे लागणार...... ज्या वेळेस माझा समाज जागा होईल, मी हे लिहिलेल वाचेल आणि त्यानुसार वाटचाल करेल त्यावेळेस मी झोपेन, तेव्हाच मला सूखाची झोप लागेल...

।। आजची स्थिती बघून वाटते ।।* *।। बाबासाहेब अजून झोपलेच नसतील ।।* *।। त्यांना आजपर्यंत सूखाची झोप लागलीच नसेल ।।*!

जोपर्यंत आपला समाज एकत्र येत नाही तोपर्यंत समाजाची प्रगती होणार नाही.....

।। वाचाल तर वाचाल ।।

।। जो शिकला तो टिकला ।।

*।।विश्वभूषन भारतरत्न महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन ।।*

।। लक्ष्मण ढवळे दादा मराठवाडा विभागीय अध्यक्ष सत्यशोधक ओबीसी परिषद ।।

# चंद्रभागा पोद्दार लर्न स्कूल च्या वतीने शासकीय नोकरदारांचा सत्कार

दिंद्रुड: येथील चंद्रभागा पोद्दार लर्न स्कूलच्या वतीने दिंद्रुड पंचक्रोशीतील व्यक्तींचा शासकीय नोकरीत भरती झाल्याबाबत सोमवारी सत्कार सोहळ्याच्या आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना नवचेतना मिळावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

दिंद्रुड पंचक्रोशीतील संगम येथील श्रीकांत होरमाळे हे वर्ग एकचे अधिकारी (बिडीओ) म्हणून शासकीय सेवेत रुजू झाले आहेत, त्याचप्रमाणे महाराष्ट्र पोलीस पदावर कृष्णा वैजनाथ तोंडे, ज्ञानेश्वरी नवनाथ सांगळे, सुमैय्या शरीफ शेख, उमेश भास्कर केकान नुकतेच भरती झाले आहेत. या पदावर जाण्यासाठी सर्वांनी घेतलेले कष्ट व अभ्यास याबाबत उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. ध्येयपूर्ती करण्यासाठी मोठे स्वप्न पहावे लागतात व ते पूर्ण करण्यासाठी कठोर परिश्रम करावे लागतात, परिश्रमाचे फळ निश्चितच मिळत असल्याचे उद्गार मनोगतात सर्व नूतन भरती झालेल्या मान्यवरांनी याप्रसंगी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष अतुल ठोंबरे, प्राचार्य निलेश निंदाने, पत्रकार संतोष स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन बिबीशन बडे तर आभार शाळेचे समन्वयक राजेंद्र पांडे यांनी मानले.



# ज्येष्ठ गायिका आशा भोसले अनंतात विलीन

## राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच विविध मान्यवर आणि चाहत्यांनी घेतले अखेरचे दर्शन

मुंबई । प्रतिनिधी

ज्येष्ठ पार्श्वगायिका, पद्मविभूषण तसेच महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित आशा भोसले यांचे १२ एप्रिल २०२६ रोजी वयाच्या ९३ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी दादर येथील कै.भागोजी कीर हिंदू स्मशानभूमी येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी पोलीस दलातर्फे बंदुकीच्या तीन फैरी झाडून मानवंदना देण्यात आली.

दिवंगत आशा भोसले यांच्या अंत्यसंस्कार प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, मंत्री छगन भुजबळ, मंत्री ड.आशिष शेलार, मंत्री शंभूराज देसाई, मंत्री भरतशेठ गोगावले, मंत्री संजय शिरसाट, मुंबई महानगरपालिका महापौर रितू तावडे, खासदार अनिल देसाई, आमदार रविंद्र चव्हाण, आमदार प्रसाद लाड, आमदार प्रकाश सुर्वे, आमदार महेश सावंत, मुंबई महानगर पालिका उपमहापौर संजय घाडी, मुंबई महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे, मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल, स्थानिक लोकप्रतिनिधी, विविध क्षेत्रातील मान्यवर, कलावंत, चाहते तसेच त्यांच्या कुटुंबीयांनी अखेरचे दर्शन घेत पुष्पचक्र वाहून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.



तत्पूर्वी, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून पाठविण्यात आलेले पुष्पचक्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवंगत आशा भोसले यांच्या पार्थिवावर अर्पण केले.

सोमवारी सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० या वेळेत दिवंगत आशा भोसले यांचे पार्थिव त्यांच्या राहत्या घरी अंतिम दर्शनासाठी ठेवण्यात आले होते. यावेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा, मंत्री मंगलप्रभात लोढा, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार सुप्रिया सुळे, खासदार प्रणिती शिंदे, खासदार प्रफुल्ल पटेल, खासदार अरविंद सावंत, आमदार आदित्य ठाकरे, आमदार भाई जगताप, आमदार सुनील शिंदे, आमदार मिलिंद नार्वेकर विविध क्षेत्रातील मान्यवर, कलावंत तसेच चाहत्यांनी त्यांचे अखेरचे दर्शन घेत श्रद्धांजली अर्पण केली.

# मुख्यमंत्री सहाय्यता निधीची नवीन ऑनलाईन प्रणालीमुळे मदत आणि उपचाराला मिळणार गती

## आता रुग्णाऐवजी थेट कक्षाशी संलग्न असणाऱ्या रुग्णालयामार्फत अर्ज सादर करता येणार

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना उपचारासाठी आर्थिक सहाय्य अधिक वेगात मिळणार आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची अद्यावत ऑनलाईन प्रणाली सुरू होणार आहे. या प्रणालीमुळे अर्ज मंजुरीची प्रक्रिया कार्यालयीन ८ तासांत पूर्ण होणार आहे. विशेष म्हणजे आता रुग्णाऐवजी थेट कक्षाशी संलग्न असणाऱ्या रुग्णालयामार्फत अर्ज सादर होणार आहेत. त्यामुळे रुग्णाला कोणत्याही प्रकारचा अर्ज भरावा लागणार नाही. त्यामुळे उपचार प्रक्रियेला गती मिळणार आहे. या प्रणालीचे येत्या काही दिवसातच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उदघाटन करण्यात येणार आहे अशी माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षा कडून देण्यात आली आहे.

गेल्या काही वर्षभरापासून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षामध्ये नावीन्य पूर्ण रुग्णस्नेही बदल करण्याचे काम सुरु आहे. त्याचाच एक भाग मुख्यमंत्री सहाय्यता निधीची नवी ऑनलाईन प्रणाली असणार आहे. रुग्णाने रुग्णालयात सर्व रीतसर कागदपत्रे दिल्यानंतर रुग्णालय प्रशासन त्याचा अर्ज मुख्यमंत्री सहायता निधी कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविणार आहे. त्या ठिकाणी नियमानुसार सर्व कागदपत्रे असल्यास अर्ज मंजुरीची प्रक्रिया कार्यालयीन ८ तासांत पूर्ण होणार आहे. यामुळे रुग्ण आणि त्याच्या नातेवाईकाला मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच, गेल्या आर्थिक वर्षात १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्षप्रमुख रामेश्वर नाईक म्हणाले की, रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी ही ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात येत आहे. यामुळे आता अर्ज मंजुरीची प्रक्रिया जलद होऊन रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या नवीन प्रणालीचे अधिकृत उद्घाटन लवकरच होणार असून, त्यानंतर राज्यभरात ती प्रभावीपणे राबवण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी गरजू रूग्णांनी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.



# ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या संकल्पनेतील संगीत संस्था स्थापन करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई । प्रतिनिधी

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांच्या संकल्पनेतील संगीत संस्था स्थापन करण्यासाठी सकारात्मक पावले उचलण्यात येतील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे सांगितले.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य मंत्री उपस्थित होते.स्व. आशाताईंनी यांनी संगीत क्षेत्राशी निगडीत संस्था स्थापन करण्याचा प्रस्ताव दिला होता. हा प्रस्ताव शासन पुढे घेऊन जाईल. आशाताईंच्या संकल्पनेतील संस्था साकार व्हावी यासाठी सकारात्मक पावले उचलली जातील, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. बैठकीत मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी श्रीमती भोसले यांच्या निधनाबद्दलचा शोकप्रस्ताव वाचून दाखविला.

# अपघाताचे प्रमाण कमी करून मृत्यूचे प्रमाण घटविण्यासाठी मोहिम राबविणार

एसपी नवनीत काँवत

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी जिल्हा पोलिस दलाच्या वतीने प्रयत्न केले जात आहेत. बीड जिल्ह्यात सन २०२५- २६ या वर्षात अपघाताची संख्या कमी करण्यात यश आले आहे. अपघातात मृत्यू पावणारांची संख्या कमी करण्यासाठी विशेष प्रयत्न करून मोहीम राबवून प्रयत्न करणार येणार आहे. जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी अधिकारी सुभाष सानप यांनी जिल्ह्यात वाहतूक शाखेला उल्लेखनीय काम केले, असे गौरवोद्गगार जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी काढले.

या संदर्भात बोलतांना जिल्हा पोलिस अधीक्षक काँवत म्हणाले, जिल्हा वाहतूक वाहतूक शाखेमार्फत वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. जिल्ह्यातील अपघातग्रस्त स्थळांची पाहणी करून त्याच्यावर उपाययोजना करण्यासंदर्भात परिवहन विभाग, आणि पोलिसांच्या पथकासह प्रयत्न करण्यात आले. त्यामुळे गेल्या वर्षी जिल्ह्यातील अपघाताचे प्रमाण २५ टक्के कमी झाले आहे.

सन २०२४ मध्ये ११४० अपघात झाले तर २०२५ मध्ये ९८० अपघाताची संख्या आहे. गेल्या वर्षी अपघाताची संख्या १६० ने घटली. सन २०२५ जानेवारी ते मार्च २४१ तर २०२६ मध्ये २०६ अपघात झाले ३५ अपघात कमी झाले. यावर्षात अपघाताची संख्या घटविण्यासाठी व मृत्यूचे प्रमाण कमी होण्यासाठी विशेष खबरदारी घेतली जाईल.

विनानंबर वाहननाविरुद्ध कठोर कारवाई

जिल्ह्यात नंबर नसलेल्या वाहनाविरुद्ध कठोर मोहीम राबवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. विशेषताने वाळू वाहतूक करणाऱ्या हायवा विरुद्ध कारवाई करण्यात येणार, असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी म्हटले आहे.

पोलिसांच्या बदल्या नियमानुसार पारदर्शक होणार

गेल्या वर्षी शासन आदेशानुसार नियमानुसार सुमारे ६०० च्या वर बदल्या करण्यात आल्या होत्या यावर्षी बारा वर्ष आणि स्वस्त लोक अशी संख्या खूप कमी असून कमी आहे त्यामुळे सुमारे २०० पोलीस कर्मचाऱ्यांच्या नियमानुसार आणि पारदर्शक करण्यात येतील.

जिल्ह्यातील कायदा, सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि गुन्हेगारीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कार्यक्षम आणि कर्तव्य तत्पर अधिकारी देण्यासंदर्भात प्रयत्न करणार असल्याचे पोलिस अधीक्षक यांनी म्हटले आहे.








# औद्योगिक भेटीद्वारे आदित्य अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ज्ञानाचा अनुभव

बीड । प्रतिनिधी

आदित्य अभियांत्रिकी महाविद्यालय, बीड येथील सिव्हिल इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी सामनापूर येथील हॉट मिक्स प्लांट आणि आरएमसी प्लांट येथे औद्योगिक भेटीचे यशस्वी आयोजन करण्यात आले.या औद्योगिक भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामकाज, आधुनिक यंत्रसामग्री आणि बांधकाम प्रक्रियेची सखोल माहिती मिळाली. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडून त्यांच्या व्यावहारिक कौशल्यांचा विकास झाला.महाविद्यालयाचे माननीय चेअरमन डॉ. आदित्य सरडा यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच डॉ. बहादुरे सर यांनी मार्गदर्शन करून उपक्रम यशस्वी करण्यात मोलाची भूमिका बजावली.सिव्हिल इंजिनिअरिंग विभागप्रमुख डॉ. कृष्णा पंत यांच्या नेतृत्वाखाली आणि प्रा. चोरे ए. ए. यांच्या समन्वयातून ही औद्योगिक भेट यशस्वीरित्या पार पडली. या उपक्रमात विभागातील प्रा. डी. पी. तावरे, प्रा. मस्के एस. एल., प्रा. खेडकर आर. ए., प्रा. चोरे एस. जी., प्रा. डोके एस. एस. आणि प्रा. ढोले सागर यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.तसेच आरएमसी प्लांटचे चेअरमन श्री. श्रीनिवास यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल महाविद्यालयाने मनःपूर्वक आभार व्यक्त केले.या औद्योगिक भेटीमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण घेण्याची उत्तम संधी मिळाली असून अशा उपक्रमांचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.






## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती उत्साहात साजरी करा : पप्पू कागदे

बीड/प्रतिनिधी

भारतरत्न, भारतीय संविधानाचे शिल्पकार आणि सामाजिक न्यायाचे महान प्रणेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती यंदा मोठ्या उत्साहात, एकोप्याने आणि समाजप्रबोधन करणाऱ्या विविध उपक्रमांद्वारे साजरी करावी, असे आवाहन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केले आहे.डॉ. आंबेडकर यांनी दिलेल्या समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मूल्यांवरच भारतीय लोकशाहीची भक्कम पायाभरणी उभी आहे. त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे ही केवळ जबाबदारी नसून एक सामाजिक बांधिलकी आहे, असेही त्यांनी नमूद केले. जयंती हा केवळ उत्सव किंवा परंपरा नसून त्यांच्या क्रांतिकारी विचारांचा प्रसार करण्याचा आणि समाजाला योग्य दिशा देण्याचा एक प्रभावी माध्यम आहे, असे कागदे यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर, स्वच्छता अभियान, शैक्षणिक मार्गदर्शन, व्याख्याने, वाचन स्पर्धा, तसेच सामाजिक ऐक्य वाढविणारे विविध कार्यक्रम आयोजित करावेत. यामुळे जयंती उत्सवाला केवळ औपचारिकतेचे स्वरूप न राहता तो समाजपरिवर्तनाचा प्रेरणादायी उत्सव ठरेल.

तसेच, जयंती उत्सव शांततेत, शिस्तबद्ध पद्धतीने आणि बंधुभाव जपत साजरा करण्याचे आवाहन पप्पू कागदे यांनी केले. समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण करून सर्व घटकांना एकत्र आणण्याचे कार्य या जयंतीच्या माध्यमातून घडावे, हीच खरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन ठरेल, असेही त्यांनी शेवटी सांगितले.





